ePaper

# पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा नाही!; नितीशकुमार यांची भूमिका



| वर्ष - 6 । अंक - 128 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- ग्रामपंचायत निवडणुकांचं मैदान कोण मारणार?
- भामा आसखेडच्या पाण्याला घटस्थापनेचा मुहूर्त !
- सातार्‍यात विकासकामे ठप्प

www.mahaenews.com | ।शनिवार । दिनांक 13 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आकुर्डी-प्राधिकरणातील माडगुळकर नाट्यगृहाचा खर्च 37 कोटीवरून 70 कोटींवर

# वाढीव खर्चाची 'घंटा'!

## अद्यापही काम अर्धवट अवस्थेत, प्रशासक राजवटीतही खर्च वाढला

**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**





नागरिकांची सांस्कृतिक भुक भागविण्यासाठी सन २०१३ मध्ये ८०० प्रेक्षकक्षमता असलेले आकुर्डी - प्राधिकरणात ज्येष्ठ साहित्यिक ग. दी. माडगुळकर नाट्यगृह उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, महापालिकेतील पदाधिकारी, अधिकारी आणि ठेकेदारांची पैशाची भुक भागत नसल्याने आठ वर्षात या नाट्यगृहाचे काम ३७ कोटीवरून ७० कोटींवर पोहोचले. आता या नाट्यगृहातील कलाकारांच्या मेकअप रूमसाठी फर्निचर व इतर किरकोळ स्वरूपाच्या कामांसाठी १० लाखांचा खर्च केला जाणार आहे. सध्या कॉन्फरन्स हॉल, आर्ट गॅलरी, कॅपेटएरिया, निवासी खोल्यांचे आणि बाह्य सजावटीचे काम अर्धवट अवस्थेत आहे.

ज्येष्ठ साहित्यिक ग. दी. माडगुळकर यांच्या नावाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने आकुर्डी - प्राधिकरणात ८०० प्रेक्षकांची बैठक व्यवस्था असलेले उत्तम प्रतीचे नाट्यगृह उभारण्यात येत आहे.

पेठ क्रमांक २६ मधील ५ हजार चौरस मीटर भुखंडावर हे नाट्यगृह उभे केले जात आहे. या नाट्यगृहामध्ये २२० प्रेक्षक क्षमता असलेले एक लहान सभागृह, ११० बैठक व्यवस्था असलेले कॉन्फरन्स हॉल आणि कलादालन तसेच १२ निवासी खोल्या बांधण्याचे नियोजन आहे.

नाट्यगृहात आधुनिक पद्धतीने विद्युत व्यवस्था करणे, ध्वनी व्यवस्था करण्याचे नियोजन आहे. नागरिकांसाठी ॲम्पिथियटर, रेस्टॉरंटची सोयही करण्यात येणार आहे. या नाट्यगृहाच्या कामाला सन २०१३ मध्ये मंजुरी मिळाली. त्यावेळी ३७ कोटीचा खर्च अपेक्षित धरण्यात आला होता. त्यांनतर हा खर्च ७० कोटींवर पोहोचला आहे.

### नाट्यगृहाचे काम संथगतीने...

नाट्यगृहाचे काम सुरूवातीपासून संथगतीने सुरू आहे. सध्या या नाट्यगृहातील काम अंतिम टप्प्यात आहे. नाट्यगृहातील कलाकारांच्या मेकअप रूमसाठी आवश्यक असणारे फर्निचर व इतर किरकोळ स्वरूपाची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी सुमारे १० लाख रूपये निधीची आवश्यकता आहे. या नाट्यगृहाचे उद्‌घाटन लवकरच होणार असल्याने ही फर्निचरची कामे तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे आकुर्डी नाट्यगृहातील कलाकारांच्या खोलीतील मेकअप रूमसाठी आवश्यक असणारे फर्निचर व इतर किरकोळ स्वरूपाची कामे करण्यात येणार आहे. त्यासाठी १० लाखाचा खर्च केला जाणार आहे.

# खंडाळा घाटात दरड कोसळली, पुणे-मुंबई रेल्वेसेवा पूर्णपणे विस्कळीत

## मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या गाड्या थांबवल्या

**लोणावळा**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे मुंबई लोहमार्गावर खंडाळा घाटातील नागनाथ ते पळसदरी दरम्यान पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्याने पुणे मुंबई रेल्वे वाहतूक सेवा विस्कळीत झाली. पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वे गाड्या खंडाळा, लोणावळा व विविध रेल्वे स्थानकांवर थांबविण्यात आल्या. तर मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या रेल्वे गाड्या कर्जत रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आल्या.**

मंकीहील ते ठाकुरवाडी दरम्यान रेल्वे मार्गावर दरड कोसळली. दरड कोसळल्यामुळे पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेच्या वाहतुकीवर परिणाम झाला. अप लाईनची वाहतूक मिडल लाईनवर वळविण्यात आली. त्यामुळे अप लाईनची वाहतूक विस्कळीत झाली.

रात्री उशिरा पर्यंत दरड हटविण्याचे काम सुरु होते अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.

पुणे मुंबई लोहमार्गावर खंडाळा घाटातील नागनाथ ते पळसदरी दरम्यान पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्याने पुणे मुंबई रेल्वे वाहतूक सेवा विस्कळीत झाली. पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वे गाड्या खंडाळा, लोणावळा व विविध रेल्वे स्थानकांवर थांबविण्यात आल्या. तर मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या रेल्वे गाड्या कर्जत रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आल्या.

दरड कोसळल्याची माहिती समजल्यानंतर रेल्वेचे अधिकारी, कर्मचारी व सर्व यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली, युद्ध पातळीवत दरड बाजुला काढण्याचे काम सुरू करण्यात आले.

खंडाळा घाटात रेल्वे मार्गावर दरड कोसळलीपुणे-मुंबई रेल्वे वाहतूक विस्कळीतअप लाईनवरील वाहतूक मिडल लाईनवर वळविली. रात्री उशिरा पर्यंत दरड हटविण्याचे काम सुरु होते अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.



# ग्रामपंचायत निवडणुकांचं मैदान कोण मारणार?

## शिरुरमध्ये कोल्हे-आढळरावांची प्रतिष्ठा पणाला

**। पुणे । महाईन्यूज ।**

**राज्यात ६०८ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १८ सप्टेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकांमध्ये आता थेट जनतेतून सरपंच निवडला जाणार असल्याने भावी सरपंचांनी आता कंबर कसली आहे. पुण्यातील जुन्नर तालुक्यातील ३८, आंबेगाव तालुक्यातील १८, खेड तालुक्यातील ५ तर भोर तालुक्यातील २ ग्रामपंचायतींची निवडणूक होणार आहे. आज राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी कार्यक्रम जाहीर केला आहे.**



**▶▶| पुणे जिल्ह्यात 63 गावात गुलाल उधळणार**

**▶▶| अमोल कोल्हे आणि आढळराव पाटलांची प्रतिष्ठा पणाला**

### कोल्हे-आढळरावांची प्रतिष्ठा पणाला

**पुणे जिल्ह्यातील राजकारणाचे मैदान असलेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघातील ६२ ग्रामपंचायतीत निवडणूक होत असल्याने पुणे जिल्ह्याचे राजकारण कमालीचे तापणार आहे. ग्रामपंचायत निवडणूक होत असली तरी ही लढाई प्रामुख्याने महाविकास आघाडी विरुद्ध शिंदे गट अशीच होणार असल्याचे चित्र आहे. शिवसेनेतून शिंदे गटात सहभागी झालेले शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील आणि खासदार अमोल कोल्हे यांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे.**

घोषित कार्यक्रमानुसार संबंधित तहसीलदार १८ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्रे २४ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२२ या कालावधीत दाखल करण्यात येतील. शासकीय सुट्टीमुळे २७, २८ आणि ३१ ऑगस्ट रोजी नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नाहीत. नामनिर्देशनपत्राची छाननी २ सप्टेंबर २०२२ रोजी होणार असून नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ६ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी ३ पर्यंत असणार आहे. मतदान १८ सप्टेंबरला सकाळी साडे सात ते सायंकाळी साडे पाचपर्यंत करता येणार आहे. तर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १९ सप्टेंबरला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, संबंधित ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दादा मंत्रिमंडळात, भाऊंकडे संघटनेचा चार्ज, प्रदेशाध्यक्ष बदलावर चंद्रकांत पाटील म्हणाले...

आढळराव पाटील यांचे गाव असलेल्या आंबेगावात १८ तर राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनके यांचे प्राबल्य असलेल्या आणि लोकसभा निवडणुकीत कोल्हेंना मोठे मताधिक्य देणाऱ्या जुन्नर तालुक्यात ३८ ग्रामपंचायतीमध्ये निवडणूक होत असल्याने दोन्ही नेत्यांनी आतापासूनच जय्यत तयारी सुरु केली असून दोन्ही नेते आपली ताकद दाखवण्यासाठी सज्ज आहेत. राष्ट्रवादी आपल्याला कमजोर करत असल्याची टीका करत शिंदे गटात दाखल झालेल्या आढळराव पाटलांसाठी ही निवडणूक खऱ्या अर्थाने अस्तित्वाची लढाई असल्याचं बोललं जात आहे.

---

## महापालिकेकडून स्वातंत्र्य दिनाची जय्यत तयारी




**पिंपरी । विद्युत रोषणाईने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य इमारतीसह क्षेत्रीय कार्यालयांच्या इमारती उजाळून निघाल्या आहेत. रंगरंगोटी, रांगोळी, पुष्पमालांनी परिसर नटले आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त सगळीकडे चैतन्यमय वातावरण पसरले असून महापालिकेने स्वातंत्र्य दिनाची जय्यत तयारी केली आहे.**

## जलशुद्धीकरण केंद्रांत दैनंदिन २१ टन गाळ ; धरणातील गाळ प्रक्रिया करून शुद्ध पाण्याचा पुरवठा

**पावसाळ्याच्या कालावधीत गाळाचे प्रमाण 42 टक्क्यांपर्यंत पोहोचत आहे**

**पुणे । महाईन्यूज ।**

**धरणांच्या पाणलोट क्षेत्राच्या लगत डोंगर फोडून होत असलेल्या बांधकामांमुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील गाळ जलवाहिन्यांतून थेट महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात येत आहे. पर्वती, वडगांव आणि भामा-आसखेड जलशुद्धीकरण केंद्रात दैनंदिन २० ते २१ टन गाळ येत असून तो बाहेर काढला जात आहे. दरम्यान, पावसाळ्याच्या कालावधीत गाळाचे प्रमाण ४२ टक्क्यांपर्यंत पोहोचत आहे. धरणातील गाळ जलशुद्धीकरण केंद्रात येत असला तरी योग्य ती प्रक्रिया करून पाणी शुद्ध केले जात असून शुद्ध पाण्याचे वितरण महापालिकेकडून करण्यात येत आहे.**



शहर आणि परिसराला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेकडून धरणातून प्रतीदिन १ हजार ६५० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी धरणातून उचलण्यात येते. तर वर्षाला २२ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढे पाणी घेतले जाते. बंद जलवाहिनीद्वारे पर्वती जलशुद्धीकरण केंद्रात पाणी आणण्यात येते. यापूर्वी कालव्यातून पाणी विद्युत पंप लावून घेतले जात होते. मात्र पाणी गळती, चोरी रोखण्यासाठी आता बंद जलवाहिनीद्वारे पाणी घेण्यात येत आहे.

जलशुद्धीकरण केंद्रात जलवाहिनीतून पाण्याबरोबर माती मिश्रित गाळही येतो. जुन्या जलशुद्धीकरण केंद्रात हा गाळ पाण्यातून वेगळा केला जातो. पर्वती जलशुद्धीकरण केंद्रातून दररोज १२ टन, वडगांव जलशुद्धीकरण केंद्रातून दररोज सहा टन आणि भामा-आसखेड जलशुद्धीकरण केंद्रातून २.५ टन एवढा गाळ बाहेर काढला जात आहे. जलशुद्धीकरण केंद्रात गाळ मिश्रित पाणी आल्यानंतर पहिल्या टप्प्यात क्लोरिन टाकून पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया केली जाते.

### येत्या 24 ऑगस्टपर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण होईल

# भामा-आसखेड, आंद्राच्या पाण्याला घटस्थापनेचा मुहूर्त !

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा सक्षम करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाकांक्षी असलेल्या भामा आसखेड, आंद्रा प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून, येत्या २४ ऑगस्टपर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येईल.**



वीज जोडणी करुन प्रकल्प कार्यान्वयीत होईल. त्यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात जलशुद्धीकरण केंद्रांतील पाण्याचे 'टेस्टिंग' करण्यात येईल. त्यानंतर सप्टेंबरअखेर अर्थात घटस्थापनेच्या मुहुर्तावर पिंपरी-चिंचवडकरांच्या दारात भामा आसखेडचे शुद्ध पाणी येईल, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे. भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडचा पाणी पुरवठा सुरळीत आणि सक्षम करण्यासाठी आंद्रा व भामा-आसखेड प्रकल्पाचे काम मार्गी लावले होते. काहीदिवसांपूर्वी प्रकल्पाची पाहणी करण्यात आली होती. तसेच, प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून भामा आसखेड प्रकल्पांतर्गत निघोजे आणि तळवडे येथील इंद्रायणी नदीजवळ उपसा केंद्र या ठिकाणी पंपिंग मशिनरी उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पासाठी २२ केव्ही उच्चदाब क्षमतेची वीजजोडणी करण्याचे काम दि. २४ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर नदीजवळ उपसा करुन पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाईल. तसेच, चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्राचे काम येत्या २० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर पाण्याचे टेस्टिंग सुरू होईल. सर्व तापासणी केल्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात शुद्ध पाणी पुरवठा शहराला होईल, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

### पिंपरी-चिंचवडकर पाण्यासाठी स्वयंपूर्ण होतील...

सध्यस्थितीला पिंपरी-चिंचवडसाठी पवना धरणातून पाणी पुरवठा होतो. त्यामुळे पवना धरणाव्यतिरिक्त शहरासाठी पाणी पुरवठ्याचे अन्य स्त्रोत निर्माण करणे गरजेचे होते. भाजपाचे तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सकारात्मक निर्णय घेतला. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महापालिकेतील भाजपाच्या सत्ताकाळात आंद्रा धरणातून १०० एमएलडी आणि भामा आसखेडमधून १६७ एमएलडी पाणी पिंपरी-चिंचवडला मिळण्यासाठी प्रकल्पाला मंजुरी मिळाली. कोविड आणि लॉकडाउनच्या परिणामामुळे नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यात प्रशासनाला अडचणी आल्या. अखेर सर्व अडचणींवर मात करीत प्रकल्प पूर्णत्वास येत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकर आता पाण्यासाठी स्वयंपूर्ण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# स्मार्ट सिटीचे सर्व प्रकल्प वर्षात पूर्ण करा

## अभियानाचे संचालक राहुल कपूर यांच्या सूचना

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी राहुल कपूर आणि प्रकल्प सल्लागार संपत कुमार शहरात आले होते. स्मार्ट सिटी अभियानाअंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व प्रकल्प जुलै २०२३ पर्यंत पूर्ण करावेत, अशा सूचना स्मार्ट सिटी अभियानाचे संचालक राहूल कपूर यांनी पिंपरी पालिकेला केल्या आहेत.

स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी राहुल कपूर आणि प्रकल्प सल्लागार संपत कुमार शहरात आले होते. यावेळी



झालेल्या बैठकीत प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील, सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य वित्तीय अधिकारी सुनील भोसले आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या सर्व प्रकल्पांची राहुल कपूर यांनी माहिती घेतली. प्रकल्प सल्लागारांनी सौरऊर्जा प्रकल्प, स्मार्ट किओक्स, स्कील डेव्हलपमेंट सेंटर, स्टार्ट अप इन्क्युबेशन सेंटर, ई– क्लास रुम, ई- टॉयलेट, सिटी मोबाईल ॲप तसेच पाणीपुरवठा, पर्यावरण, वाहतूक, वाहनतळ, सुरक्षाविषयक आदी प्रकल्पांचे सादरीकरण केले. याशिवाय, पिंपळे गुरव व पिंपळे सौदागर परिसरातील राजमाता जिजाऊ उद्यान व वाहनतळ व्यवस्था, रस्ते, पदपथ, ज्येष्ठ नागरिकांसाठीची खुली व्यायामशाळा, बैठक व्यवस्था, सुदर्शन चौकात सलग ७५ तासांत उभारण्यात आलेला "८ टू ८० पार्क" प्रकल्प, रस्ते व सायकल ट्रक अशा प्रकल्पांचे कपूर यांनी कौतुक केले. स्मार्ट सिटीचे प्रकल्प कसे उपयुक्त आहेत, याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या बैठकीत त्यांनी पिंपरी पालिकेला केल्या.

# पिंपरी पालिकेचा लाचखोर सर्व्हेअर सेवानिलंबित

## विभागीय चौकशीचे आयुक्तांचे आदेश, तीन लाख रुपयांची लाच मागितल्याचे प्रकरण

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने तीन लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी अटक केलेल्या नगररचना विभागातील सर्व्हेअरला सेवानिलंबित करून विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांनी याबाबतचे आदेश दिले.**



संदीप फकिरा लबडे (वय ४८) असे या सर्व्हेअरचे नाव आहे. ३ ऑगस्टला पालिका मुख्यालयात ही कारवाई झाली होती. ३८ वर्षीय नागरिकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याविषयी तक्रार दिली होती. तक्रारदाराच्या कंपनीचे काम करून देण्यासाठी तीन लाख रुपयांची मागणी आरोपीने केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मुख्यालयात सापळा रचून पैसे घेताना आरोपीला अटक केली.

या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर, आयुक्त राजेश पाटील यांनी लबडेला अटकेच्या दिवसापासून सेवानिलंबित केले आहे. त्याचप्रमाणे, विभागीय चौकशीचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत.

## संपादकीय »

# जगण्याचा अधिकार तरी मिळू द्या!

***'मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न' हा अन्वयार्थ वाचला. कुठल्याही प्रकारच्या स्वातंत्र्यापेक्षा सन्मानपूर्वक व प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्याचा अधिकार सर्वात महत्त्वाचा आहे. माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा तो जन्मसिद्ध अधिकार आहे.***

अशा या मूलभूत मानवी हक्काचे संवर्धन व जोपासना करणे हे राज्याचे आद्य कर्तव्य असते. मात्र स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असतानादेखील देशातील लाखो सफाई कामगारांना मलजल सफाई करण्यासाठी प्रत्यक्ष गटारात उतरून काम करावे लागते, जीव धोक्यात घालावा लागतो, ही फारच क्लेशदायक गोष्ट आहे. हे आजही असलेल्या सामाजिक पारतंत्र्याचे निदर्शक आहे.

मुंबईचा शांघाय किंवा वाराणसीचा क्योटो करण्याच्या निर्थक वल्गना करणाऱ्या आपल्या राजकीय पुढाऱ्यांना सफाई कामगारांच्या व्यथांकडे लक्ष द्यायला मात्र अजिबात वेळ नाही. हजारो कोटींचे बजेट असलेल्या देशातील मोठमोठ्या महानगरपालिका मलजल व्यवस्थापनासाठी यंत्रांचे साहाय्य घेण्याच्या बाबतीत अजूनही गांभीर्याने विचार करताना दिसत नाहीत, ही शोकांतिकाच आहे. या कामगारांना कुठल्याही प्रकारची सुरक्षा साधने दिली जात नाहीत. जी दिली जातात ती निकृष्ट दर्जाची असतात. या कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज सरकार वा प्रशासनाला भासत नाही. जीवन जगण्याच्या अधिकाराची जोपासना केली जात नसेल, तर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव काय किंवा शताब्दी काय, काहीही साजरे करण्यात अर्थ उरत नाही.

नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या पदकतालिकेत भारताला चौथे स्थान मिळाले. यंदा आपण २२ सुवर्ण पदकांसह ६१ पदकांची कमाई केली. ही कामगिरी फार वाखाणण्याजोगी नाही. दिल्लीत २०१० साली झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय क्रीडापटूंनी ८१ सुवर्ण पदकांसह एकूण १०१ पदके प्राप्त करत दुसरे स्थान मिळविले होते. त्या तुलनेत यंदा कामगिरी घसरली, हे मान्य करावे लागेल. काही विशिष्ट खेळांमध्ये (विशेषत: नेमबाजी, कुस्ती, बॅटमिटन) आपली कामगिरी चांगली असते. भारताला क्रीडा क्षेत्रात नवी उंची गाठायची असेल, तर शालेय स्तरापासून शारीरिक शिक्षण क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यासाठी उत्तम प्रशिक्षक नेमले जाणे आणि इतर कोणत्याही क्रमिक विषयाएवढेच महत्त्व क्रीडेलाही देणे गरजेचे आहे. मोबाइल गेम खेळण्यात सदैव गढून जाणाऱ्या पिढीसाठी तर हे अपरिहार्य आहे.

'राष्ट्रकुलवंत!' हे संपादकीय वाचले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली, याबद्दल शंकाच नाही. ७२ देश आणि सुमारे पाच हजार खेळाडूंनी २८३ क्रीडा प्रकारांमध्ये नैपुण्य दाखविणे सामान्य नाही. यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पूर्वीपेक्षा अधिक खेळांचा समावेश होता.



## आनंदी सकाळ

# 'ये हृदयीचे हृदयी'

समुद्राच्या किनाऱ्यावर अथवा त्यामधील एखाद्या बेटावर उभा असणारा मनुष्य त्यातील लाटांचे नर्तन बघू शकतो, त्यापासून आनंद घेऊ शकतो, त्याचे सौंदर्य अनुभवू शकतो; कारण तो त्या समुद्रापासून अलिप्त असतो. लाटांनी कितीही रौद्र रूप धारण केले, तरी तो त्यामुळे भयभीत होत नाही. तसे ज्याने आत्मज्ञान प्राप्त करून घेतले आहे, तो या भवसागरात येणाऱ्या लाटांमुळे, संकटांमुळे भयभीत होत नाही. उलट भगवंताची लीला म्हणून त्याकडे पाहिल्याने, त्यापासून आनंदच घेऊ शकतो. ज्या वेळी ती व्यक्ती स्वतःला त्या समुद्रात झोकून देईल, त्या वेळी मग तिलाही लाटांबरोबर हेलकावे खावे लागतील, दुःख भोगावे लागेल. म्हणूनच, या भवसागरातून पार होण्यासाठी आपण किनाऱ्यावर उभे राहिले पाहिजे. त्यापासून स्वतःला वेगळे काढले पाहिजे. हे नरदेहातच शक्य आहे; कारण बुद्धीची देणगी फक्त मानवाला आहे.



## भूमिका

# पोलीस आणि गुंड



कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कुठल्याही प्रशासनाचा एक महत्त्वाचा आणि अपरिहार्य भाग म्हणजे पोलीस. 'पोलीस' हा मराठीने पूर्णत: सामावून घेतलेला एक इंग्रजी शब्द. मुळात पोलीस शब्द 'पॉलिस' म्हणजे नगर या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा मूळ अर्थ नगरसेवक. आज मात्र कायद्याची अंमलबजावणी हे पोलिसांचे प्रमुख कार्य मानले जाते. शिपाई (मूळ अरबी रूप – सिपाई) हा शब्दही त्याऐवजी कधी कधी योजला जातो; पण पोलीस शब्दातील नेमकी छटा त्यात येत नाही. त्यामुळे पोलीस हाच शब्द आज मराठीने आणि इतरही बहुतेक भाषांनी आपला म्हणून स्वीकारला आहे.

सर रॉबर्ट पील यांनी लंडनमध्ये १८२९ साली पहिली पद्धतशीर पोलीस यंत्रणा उभारली आणि आजही ती आदर्श मानली जाते. त्यांच्या नावावरूनच इंग्लंडमध्ये पोलिसांना 'बॉबी' म्हणायची प्रथा रूढ झाली. कारण इंग्लिशमध्ये 'बॉबी' हे रॉबर्टचे लघुरूप आहे. जसे की टेड (एडवर्डचे लघुरूप), बिल (विलियमचे लघुरूप), जिम (जेम्सचे लघुरूप), बेन (बेंजामिनचे लघुरूप), जो (जोसेफचे लघुरूप), माइक (मायकेलचे लघुरूप) इत्यादी.

आज इंग्रजीत तसेच मराठीतही प्रचलित असलेले अनेक शब्द पॉलिस या ग्रीक शब्दापासून तयार झाले आहेत. उदाहरणार्थ, पॉलिसी (धोरण), पॉलिटिक्स (राजकारण), कॉस्मोपॉलिटन (बहुढंगी), मेट्रोपोलीस (महानगर). आपण आयुर्विमा उतरवतो त्यालाही पॉलिसीच म्हणतात.

'गुंड' शब्द मराठीत आला तो हिंदीतील 'गुंडा' या शब्दावरून. पुढे तो जगभर गेला. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीतही 'गुंडा' शब्द १९२० सालापासून समाविष्ट आहे. त्यातूनच पुढे इंग्रजीत 'गून' हा त्याच अर्थाचा शब्द तीसच्या दशकात रूढ झाला. भारतात गुंडांचा बंदोबस्त करण्यासाठी म्हणून जे कायदे आहेत त्यांनाही 'गुंडा ॲक्ट' असे म्हटले गेले आहे. 'गुंडागर्दी', 'गुंडाराज' ही त्याच शब्दाची रूपे. अर्थात प्रत्येक वेळी 'गुंडा' शब्द निंदाव्यजक आहे असे नाही. अनेक घरांत पूर्वी एखाद्या मुलाला प्रेमाने 'गुंड्या' म्हणून हाक मारली जाई. चिमणराव-गुंड्याभाऊ ही निरागस जोडी चिं. वि. जोशींनी अमर केली आहे. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' या संतवचनात 'गुंडा' शब्दाचा अर्थ कर्तबगार असाच आहे.

# प्लास्टिक सर्जरीच्या क्षेत्रात उंच भरारी

**प्राचीन काळी गुन्हेगारांना त्यांचे नाक कापण्याची शिक्षा दिली जात असे. आपला शिक्षावास संपला, की गुन्हेगार नाकाची पुनर्रचना करण्यासाठी सुश्रुतांकडे येत.**

नाकाला कपाळाच्या अथवा गालाच्या चामडीने पुन्हा आकार दिला जात असे. 'सुश्रुत संहिता' लिहिलेले सुश्रुत हे भारताचे पहिले सर्जन आणि जगाचे 'फादर ऑफ प्लास्टिक सर्जरी' म्हणून आजही ओळखले जातात. सन १७९३मध्ये पुण्यातील एका मराठमोळ्या कुंभाराने जगातली पहिली म्हणून ओळखली जाणारी ऱ्हिनोप्लास्टी कावसजी नावाच्या एका सरकारी वाहनचालकावर केली.

अशा प्रकारे आपल्या सर्जनशील देशाने प्लास्टिक सर्जरीच्या क्षेत्रात उंच भरारी अगदी प्राचीन काळापासून घेतली आहे; तरीही आज सामान्य जनतेला असे का वाटते, की प्लास्टिक सर्जरी ही फक्त कॉस्मेटिक सर्जरी आहे, ती न परवडणारी आणि निषिद्ध आहे. हे क्षेत्र नवीन नसून, पूर्वापार चालत आलेल्या ज्ञानातून आणि सखोल संशोधनातून निर्माण झाले आहे.



पहिल्या महायुद्धात आणि त्यानंतरच्या काळात हे क्षेत्र अनेक दिशांनी घडले. युद्धात सैनिकांना चेहऱ्यावर, हातापायावर गंभीर जखमा होत. त्यांचे हात-पाय अनेक वेळा निकामी होत. तेव्हाचे डॉक्टर आणि सर्जन यांनी नसा, स्नायू, रक्तवाहिनी जोडण्याच्या व जखमा भरण्यासाठी पुनर्रचना करण्याच्या अनेक शस्त्रक्रिया केल्या आणि त्याहूनही जास्त शोधून काढल्या.

काळाबरोबर या शस्त्रक्रिया प्रकाशित होऊन चर्चेत आल्या आणि वेगळा विभाग म्हणून उभ्या राहिल्या आहेत. आज 'ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शन' अथवा 'ऑर्थोप्लास्टिक सर्जरी' असे विभाग आहेत.

जगात युद्ध चालू होते; त्या वेळी भारत कुष्ठरोगाशी लढा देत होता. कुष्ठरोगाचे रुग्ण बरे तर होत; पण त्यांचे हात-पाय विकृत होऊन राहत किंवा अनेक वेळा त्यांच्या जखमा ओल्याच राहत होत्या. अगदी अनेक वर्षे या जखमा तशाच राहत. या रुग्णांसाठी केवळ अवयवांची पुनर्रचनाच नव्हे, तर पुनर्वसनही आवश्यक होते. ही प्रक्रियाही महत्त्वाची असते.

कुष्ठरोग झाल्यामुळे विकृत झालेल्या हातांसाठी निर्माण केलेल्या शस्त्रक्रियांनी प्लास्टिक सर्जरीला भव्य रूप दिले. कित्येक रुग्णांवर हाताच्या नसांसाठी, हात चालेल अशा शस्त्रक्रिया शोधून काढल्या गेल्या.

त्या यशस्वीदेखील झाल्या. आज कुष्ठरोगाचे प्रमाण अगदी कमी आहे; पण नसांच्या विकृतीसाठी या शस्त्रक्रिया आजही केल्या जातात.

## ।। अभंगवाणी ।।



जन विजन जालें आम्हां ।
विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥
पाहें तिकडे बापमाय ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥ध्रु.॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### सोलापूरला मंत्रीपदाची प्रतीक्षा; दोन देशमुखांमधील वादामुळे भाजपची अडचण?

। सोलापूर । महाईन्यूज ।

राज्यातील एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात सोलापूर जिल्ह्यास प्रतिनिधित्व मिळाले नाही. जिल्ह्यात भाजपचे आठ आमदार आणि दोन खासदार आहेत. यापूर्वी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांच्या मंत्रिमंडळात सुभाष देशमुख आणि विजय देशमुख यांना स्थान मिळाले होते. परंतु या दोघांसह अन्य इच्छुकांची आता मंत्रीपद न लाभल्यामुळे निराशा झाली आहे. मंत्री असताना दोन्ही देशमुखांमध्ये होणारा सुप्त संघर्ष, उफाळलेली गटबाजी खुद्द फडणवीस यांनी तंबी देऊनसुध्दा संपली नव्हती. आजदेखील जिल्ह्यात भाजपचे वर्चस्व असूनही एकसूत्री नेतृत्व नाही. त्यामुळेच जिल्ह्याला मंत्रीपद मिळू शकले नाही. शिंदे-फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात सुभाष देशमुख व विजय देशमुख यांच्यासह रणजितसिंह मोहिते-पाटील, अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी व माळशिरसचे राम सातपुते यांच्यापैकी एखाद दुसऱ्या लोकप्रतिनिधीला स्थान मिळण्याची अटकळ बांधण्यात आली होती.

# साताऱ्यात विकासकामे ठप्प!

## नव्या सरकारच्या 'स्थगिती धोरणा'चा जिल्हा नियोजन समितीला फटका

। वाई । महाईन्यूज ।



राज्यात झालेल्या सत्तांतराची दखल घेत नियोजन विभागाने राज्यातील जिल्हा नियोजन मंडळाच्या वार्षिक योजनेंतर्गत जुन्या पालकमंत्र्यांनी मंजुरी दिलेल्या सर्व कामांना स्थगिती दिली आहे. राज्यात सत्तांतर होऊन भाजप आणि शिंदे गटाची सत्ता आल्याचा पहिला दणका जिल्हा नियोजन मंडळांना बसला आहे. साताऱ्यात पालकमंत्री नसल्यामुळे चारशे कोटी रुपयांची कामे ठप्प आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर ही जिल्ह्याचा कारभार पालकमंत्र्यांविना सुरू आहे. यापूर्वीच्या पालकमंत्र्यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रशासकीय मान्यता दिलेल्या सर्व कामांना स्थगिती देण्याचा आदेश देण्यात आला आहे.

१ एप्रिल २०२२ पासून मंजुरी मिळालेल्या सर्व कामांचा यामध्ये समावेश आहे. जी कामे सुरू करण्याचे आदेश तेवढीच कामे स्थगित होणार नाहीत. उर्वरित सर्व कामांचा निर्णय नवे पालक घेतील. ती कामे करायची की रद्द करायची याबाबतचा निर्णय समितीचे अध्यक्ष म्हणून नव्या सरकारच्या पालकमंत्र्यांना घ्यावा लागणार आहे.

याबरोबरच जिल्हा नियोजन मंडळातील पालकमंत्र्यांनी नियुक्त केलेल्या सदस्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसच्या सदस्यांना निरोप दिला जाईल. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वात जास्त सदस्य निवडले होते. याशिवाय जिल्हा परिषदेच्या आणि पालिकांच्या निवडणुका जवळ आल्या आहेत आणि ज्यांचा कार्यकाल संपून प्रशासक नेमले आहेत तिथले सदस्यसुद्धा बरखास्त होणार आहेत. त्याबाबत स्थानिक पातळीवरच आदेश निघण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात दरवर्षी मुसळधार पाऊस कोसळत असतो. मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे पाटण, सातारा, जावली, महाबळेश्वर, वाई या तालुक्यांत मोठे नुकसान झाले आहे. या भागांतील रस्ते दुरुस्ती, ओढ्यावरील पूल, साकव, दरडी कोसळून रस्ते उखडले आहेत त्याची दुरुस्ती. सर्व आयत्या वेळीची कामे ठप्प झाली आहेत. ज्या कामांसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात मदत मिळू शकली नव्हती त्या कामांसाठी नियोजन मंडळावर निधीसाठी अवलंबून राहावे लागते.

या वर्षीही पावसाने महाबळेश्वर तालुक्यातील छोटे-मोठे पूल पाटण तालुक्यातील रस्ते वाहून गेले आहेत. अशा सर्व कामांना मिळणारा तात्पुरता निधीही आता नियोजन मंडळ नसल्यामुळे बंद आहे.

### थांबलेला विकास

- जिल्ह्यामध्ये पालकमंत्री हेच नियोजन समितीचे अध्यक्ष असतात. पालकमंत्री नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या विकासकामांची मंजुरी रखडल्या.
- नियोजन मंडळामध्ये डोंगरी विकास योजनेची कामेही ठप्प. मोठ्या ग्रामपंचायतींना, पालिकांना जिल्हा नियोजन मंडळातून नागरी सुविधाअंतर्गत निधी देण्यात येतो. तो उपलब्ध न झाल्याने मूलभूत सेवासुविधांची कामे थांबली.
- पावसाळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या भागांत नागरिकांना त्वरित आधार देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून तात्पुरती मदत केली जाते. तीही ठप्प.

मुळातच जिल्ह्यामध्ये पालकमंत्री हेच नियोजन समितीचे अध्यक्ष असतात. पालकमंत्री नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या विकासकामाच्या मंजुरी रखडल्या आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून २०२२-२३ साठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांना स्थगिती देऊन आढावा घेण्याची सूचना केली आहे. साताऱ्याला जिल्हा वार्षिक योजनेसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. परंतु फक्त काही कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळून कामे सुरू करण्याचे आदेश प्राप्त झाले आहे. मंत्रिमंडळ विस्तार झाला तरी अजूनही जिल्ह्याला पालकमंत्री मिळालेले नाहीत. नियोजन मंडळामध्ये डोंगरी विकास योजनेची कामेही ठप्प आहेत. जिल्ह्यातील मोठ्या ग्रामपंचायतींना, पालिकांना जिल्हा नियोजन मंडळातून नागरी सुविधाअंतर्गत निधी देण्यात येतो. हा निधी उपलब्ध न झाल्याने मूलभूत सेवासुविधांची कामे ठप्प आहेत. पावसाळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या भागात नागरिकांना ताबडतोबीने आधार देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून तात्पुरती मदत केली जाते.

# चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपा प्रदेशाध्यक्षपदी निवड

## आशिष शेलारांकडे मुंबईची जबाबदारी

। मुंबई । महाईन्यूज ।

मंत्रीमंडळ विस्तारानंतर भाजपाकडून नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजपाच्या चंद्रकांत पाटील यांची मंत्रिमंडळात वर्णी लागल्यानंतर भाजपाकडून ही नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. भाजपाकडून नव्या कार्यकारिणीची घोषणा

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता आशिष शेलार यांच्याकडे



असलेली मुंबई प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. सुरुवातीला आशिष शेलार आणि राम शिंदे यांचे नाव राज्याच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या शर्यतीत होते. मात्र, चंद्रकांत बावनकुळे यांच्या गळ्यात राज्याच्या प्रदेशाध्यक्ष पदाची माळ पडली. चंद्रकांत पाटील यांची मंत्रीमंडळात वर्णी लागल्यानंतर राज्याच्या प्रदेशाध्यक्ष पद रिकामे होते. त्यानंतर आता भाजपाकडून कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या वेळी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत आशिष शेलार यांच्या नेतृत्वात भाजपाला चांगला विजय मिळाला होता. त्यामुळे येत्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा विचार करता शेलारांकडे मुंबईचे प्रदेशाध्यक्ष पद कायम ठेवण्यात आले आहे.

### आगामी निवडणुकांमध्ये ताकदीनं पक्ष उभा करणार

"भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिल्यामुळे मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, जे.पी.नड्डा तसेच देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. भाजपाला महाराष्ट्रातील एक नंबरचा पक्ष बनवून पुढे कसा नेता येईल यासाठी प्रयत्न करणार" असल्याचे बावनकुळे म्हणाले. तसेच "लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ताकदीनं पक्ष उभा करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली आहे. गेल्या २९ वर्षात पक्षानं माझ्यावर जी जबाबदारी दिली होती तो विश्वास मी सार्थ करुन दाखवणार" असल्याचेही बावनकुळे म्हणाले.

# ६०८ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १८ सप्टेंबरला मतदान

## थेट सरपंचपदाचाही समावेश

। मुंबई । महाईन्यूज ।



पावसाचे प्रमाण कमी असलेल्या विविध ५१ तालुक्यांतील ६०८ ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांसह थेट सरपंच पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १८ सप्टेंबर २०२२ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी संबंधित ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू झाली असून १९ सप्टेंबर २०२२ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज केली. राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश

सर्वोच्च न्यायालयाच्या १७ मे २०२२ रोजीच्या आदेशानुसार पावसामुळे निवडणूक कार्यक्रम बाधित होण्याची शक्यता कमी असलेले ५१ तालुके निवडून तेथील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याचबरोबर निवडणूक कार्यक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अतिवृष्टी किंवा पूर परिस्थितीसारखी नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अहवाल सादर करावा, असे आदेशही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### दिल्लीत सरकारकडून पुन्हा मास्कसक्ती

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

दिल्लीत पुन्हा एकदा करोनामुळे रुग्णसंख्या वाढू लागली आहे.

राजधानी दिल्लीत पुन्हा एकदा करोनाने डोके वर काढले आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून राज्य सरकारकडून पुन्हा एकदा मास्कसक्ती करण्यात आली आहे. मास्क न घातल्यास नागरिकांना ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात येणार आहे. खाजगी चारचाकी वाहनातून एकत्र प्रवास करणाऱ्या नागरिकांना मास्कसक्ती नसल्याचे सरकारने काढलेल्या अधिसुचनेत म्हटले आहे.

दिल्लीतील लोकनायक जय प्रकाश नारायण रुग्णालयामध्ये करोनाच्या ओमिक्रॉन विषाणूचा आणखी एक उपप्रकार आढळून आला आहे. 'BA २.७५' या नव्या ओमिक्रॉन विषाणूच्या संसर्गाचा दर जास्त असल्याची माहिती रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक

# बिहारमध्ये लोकप्रियतेच्या बाबतीत उपमुख्यमंत्री मुख्यमंत्र्यांपेक्षाही वरचढ

## महिला मतदारांनी तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदासाठी पहिली पसंती दर्शविली

**बीजिंग ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भाजपासोबत युती तोडल्यानंतर नितीश कुमार यांनी बुधवारी आठव्यांदा बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नितीश यांच्या संयुक्त जनता दलाने काँग्रेस, डावे पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलाला सोबत घेऊन राज्यात नव्या महागठबंधन सरकारची स्थापना केली. या संपूर्ण राजकीय उलथापालथीनंतर नितीश बिहारच्या मुख्यमंत्रीपदी जरी कायम राहिले असले तरी त्यांच्या लोकप्रियतेमध्ये मात्र प्रचंड घट झाली आहे. 'इंडिया टुडे' आणि 'सी व्होटर'च्या संयुक्त सर्वेक्षणात नव्या आघाडीत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे आरजेडीचे तेजस्वी यादव मुख्यमंत्रीपदासाठी पहिली पसंती असल्याचे सर्वेक्षणात समोर आले आहे. या संयुक्त सर्वेक्षणात बिहारचा पुढचा मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न विचारण्यात आला होता. विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमारांसह भाजपाच्या इतर नेत्यांना मागे टाकत तेजस्वी यादव या सर्वेक्षणात पहिल्या क्रमाकांवर आहेत. 'सी व्होटर'च्या सर्वेक्षणात ४३ टक्के लोकांनी बिहारचा पुढचा मुख्यमंत्री म्हणून तेजस्वी यादव यांना बघायला आवडेल, असे म्हटले आहे.

तर केवळ २४ टक्के लोकांनीच नितीश कुमारांना पहिल्या पसंतीचे मतदान केले आहे. १९ टक्के लोकांनी भाजपा नेत्याला मुख्यमंत्रीपदासाठी पसंती दर्शवली आहे. सर्वेक्षणानुसार तेजस्वी यादव यांच्या लोकप्रियतेमध्ये झालेली वाढ आगामी निवडणुकीत नितीश कुमारांसाठी धोक्याची घंटा ठरू शकते.भावी मुख्यमंत्रीपदासाठी मुस्लीम समाजानेही तेजस्वी यादव यांची उघडपणे बाजू घेतली आहे. ५४ टक्के मुस्लीम समाज नितीश कुमारांपेक्षा तेजस्वी यादव यांनाच उत्तम मुख्यमंत्री मानत असल्याचे या सर्वेक्षणातून समोर आले आहे. ३० टक्के मतांसह नितीश दुसऱ्या तर केवळ ३.३ टक्केच मुस्लीम समाजातील लोकांनी भाजपाला मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीसाठी योग्य समजले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बिहारी जनतेने एनडीए(NDA) आघाडीला भरघोस ५४ टक्के मतदान केले होते. मात्र, आता ऑगस्ट २०२२ पर्यंत ही टक्केवारी घटून ४१ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या ३ वर्षात एनडीएची लोकप्रियता तब्बल १३ टक्क्यांनी घटली आहे.

### महिला मतदारांसाठी पहिल्या पसंतीचा मुख्यमंत्री कोण?

महिला मतदारांनीही या सर्वेक्षणात तेजस्वी यादव यांनाच मुख्यमंत्री पदासाठी पहिली पसंती दर्शवली आहे. ४४ टक्के महिला तेजस्वी यादव यांना भावी मुख्यमंत्री म्हणून पाहण्यास उत्सूक आहेत. तर दुसरीकडे नितीश कुमारांना केवळ २३.३ टक्के महिलांनीच पसंती दर्शवली आहे. या सर्वेक्षणातही भाजपा तिसऱ्या स्थानी असून १७.५ टक्के महिलांनी भाजपाला कौल दिला आहे. २०२० मध्ये पाठिंबा देणाऱ्या महिलांमध्येही यंदा नितीश कुमारांच्या लोकप्रियतेत घट झाली आहे.दरम्यान, या सर्वेक्षणात ४१.८ टक्के पुरुषांनी तेजस्वी यादव यांनाच पहिली पसंती दर्शवली आहे. तर २३.८ टक्क्यांसह नितीश दुसऱ्या तर १९.६ टक्के मतांसह भाजपा नेते या शर्यतीत तिसऱ्या स्थानी आहेत. आरजेडी नेत्याची लोकप्रियता सर्वच स्तरांमध्ये वाढलेली दिसत आहे.

### ओबीसी, मुस्लीम समाजाचा कौल कुणाला?

जातीच्या आधारे लोकप्रियता बघायला गेल्यास तेजस्वी यादव हेच पहिल्या स्थानी कायम आहेत. ओबीसी समाजातील ४४.६ टक्के लोक तेजस्वी यादव यांच्या बाजूने आहेत. तर २४.७ टक्के लोकांनी पुन्हा नितीश यांनाच मुख्यमंत्रीपदासाठी कौल दिला आहे.

# 'राजकीय पक्षांचे मोफत धोरण ही गंभीर बाब'

## सर्वोच्च न्यायालयात याचिका; अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक असल्याचे मत

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

निवडणूक काळात राजकीय पक्षांकडून काही वस्तूंचे मोफत वितरण करण्यात येते, तसेच सत्तेत आल्यानंतर काही गोष्टी मोफत देण्याचे आश्वासन दिले जाते. सर्वोच्च न्यायालयाने राजकीय पक्षांच्या या 'मोफत धोरणा'ला गांभीर्याने घेतले आहे. मोफत वितरण ही गंभीर बाब असून त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला बाधा पोहोचते, असे मत सर्वोच्च न्यायालयाकडून गुरुवारी व्यक्त करण्यात आले.

ज्येष्ठ विधिज्ञ अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा आणि न्या. कृष्ण मुरारी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राजकीय पक्षांच्या मोफत सुविधा देण्याच्या घोषणांवर बंदी घालण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. राजकीय जाहीरनाम्याचे




नियमन करण्यासाठी आणि त्यामधील आश्वासनांना राजकीय पक्षांना जबाबदार धरण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात यावीत, अशी मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे. "हा मुद्दाच नसल्याचे काही राजकीय पक्ष सांगत आहे. मात्र हा गंभीर मुद्दा आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंचा विचार करून निर्णय घेतला जाणार आहे" असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. मोफत सुविधा आणि सामाजिक कल्याणकारी योजना या दोनी वेगळय़ा गोष्टी आहेत, असे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, अर्थव्यवस्थेचे पैसे गमावणे आणि कल्याणकारी उपाय यामध्ये समतोल साधला पाहिजे. "भारत हा असा देश आहे की जिथे गरिबी आहे आणि केंद्र सरकारचीही भुकेल्यांना अन्न देण्याची योजना आहे. अर्थव्यवस्था पैसा गमावत असल्याने जनकल्याणाचा समतोल राखता आला पाहिजे," असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

### 'आप'चा याचिकेला विरोध

सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या या याचिकेला आम आदमी पक्षाने (आप) विरोध केला आहे. कल्याणकारी योजना आणि मोफत यांमध्ये फरक आहे. पात्र आणि वंचित जनतेच्या सामाजिक-आर्थिक योजनांचे वर्णन मोफत करणे अयोग्य आहे, असे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले. याचिकाकर्त्यांच्या भूमिकेवरही पक्षाने संशय व्यक्त केला. याचिका करणारे अश्विनी उपाध्याय यांचे भाजपशी निकटचे संबंध आहेत आणि याचिकेच्या माध्यमातून ते आपला राजकीय अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहेत, असे आपच्या वतीने सांगण्यात आले.

### 'मोफत सुविधांना केंद्राचा विरोध का?'

जनकल्याणासाठी मोफत सुविधा देण्यासाठी केंद्राचा विरोध का आहे, असा सवाल दिल्लीचे मुख्यमंत्री अरिवद केजरीवाल यांनी विचारला. केंद्र सरकार ज्याप्रकारे मोफत सुविधांना विरोध करत आहे, त्यात काहीतरी गडबड आहे, असे केजरीवाल म्हणाले. अग्निपथ संरक्षण भरती योजना, केंद्रीय करातील राज्यांचा वाटा ४२ टक्क्यांवरून २९ टक्क्यांवर आणणे, खाद्यपदार्थावर लावलेला वस्तू व सेवा कर, मनरेगा निधीत २५ टक्के कपात, असे नमूद करत केजरीवाल यांनी सर्व पैसे कुठे गेले, असा सवाल विचारला. केंद्र सरकार कराच्या रूपाने मोठी रक्कम नागरिकांकडून गोळा करते.

# अल्लू अर्जुनने नाकारली 10 कोटींची ऑफर

टॉलिवूडचा सुपरस्टार अल्लू अर्जुन सध्या त्याच्या पुष्पा २ चित्रपटामुळे चर्चेत आहे. लवकरच या चित्रपटाचं शूटिंग चालू होणार आहे. दरम्यान, अल्लू अर्जुनबाबत आणखी एक विषय चर्चेत आला आहे. खरंतर अल्लू अर्जुन त्याच्या वैकुंठपुरमलो आणि पुष्पा चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर अल्लू अर्जुनला खूप प्रसिद्धी मिळाली आहे. इतकंच नाही तर त्याला अनेक चित्रपट आणि मोठमोठ्या ब्रँड्च्या जाहिरातींसाठी ऑफर देखील येत आहेत. मागील काही दिवसांपूर्वी अल्लू अर्जुनला



एका पान मसाल्याच्या ब्रँडकडून जाहिरातीसाठी ऑफर देण्यात आली होती. त्यावेळी त्याने ती कोट्यावधींची ऑफर नाकारली होती. दरम्यान, अल्लू अर्जुनला पुन्हा अशीच एक कोट्यावधींची ऑफर आली आहे.

# 'बस बाई बस'च्या मंचावर पंकजा मुंडेंचा खेळकर अंदाज!

काही दिवसांपूर्वी आलेला नवा कोरा कार्यक्रम 'बस बाई बस' याची चर्चा सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. महिला वर्गासाठी हा कार्यक्रम प्रामुख्याने सुरु करण्यात आला आहे. अभिनेते आणि दिग्दर्शक सुबोध भावे या कार्यक्रमाचं उत्तम सूत्रसंचालन करत आहे. या कार्यक्रमाच्या तिसऱ्या भागात महिलांची ही राखीव बस एका स्पेशल व्यक्तींसाठी थांबली आहे. बस बाई बस कार्यक्रमाचा नुकताच एक प्रोमो प्रदर्शित झाला त्यात माजी मंत्री पंकजा मुंडे( खेळकर अंदाजात दिसल्या. बस बाई बस कार्यक्रमाच्या आगामी भागाचा प्रोमो नुकताच प्रदर्शित झाला या कार्यक्रमाच्या आगामी भागात पंकजा मुंडे विशेष पाहुण्या म्हणून उपस्थिती लावणार असल्याचं दिसत आहे. या कार्यक्रमात सुबोध भावे पंकजा मुंडेंना भन्नाट प्रश्न विचारताना दिसणार आहे. आणि पंकजा मुंडेसुद्धा त्या प्रश्नांची उत्तरे खेळकर पद्धतीने देताना दिसत आहेत. या प्रोमोमध्ये सुबोध भावेने पंकजा मुंडेंना एक राजकारणाशी संबंधी एक प्रश्न विचारला 'तुम्ही कधी दुसऱ्या पक्षाचे आमदार फोडले आहेत का'?



सुबोध भावेच्या या प्रश्नावर पंकजा मुंडेंनी मजेशीर आणि खेळकर उत्तर दिले आहे.

# छोटू भैयाला फक्त बॅट, बॉल खेळायला हवं... उर्वशी रौतेलाचं ऋषभ पंतच्या पोस्टवर सडेतोड उत्तर

बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला सध्या भारतीय क्रिकेटर ऋषभ पंतमुळे चर्चेत आली आहे. दोघांमधील वाढत चालला आहे. सोशल मीडियावर दोघेही एकमेकांचं नाव न घेता एकमेकांवर टीका करत आहेत. ऋषभ पंतने त्याच्या सोशल मीडियावर उर्वशीबाबत एक पोस्ट लिहिली होती. त्या पोस्टचं उत्तर देत उर्वशी रौतेलाने देखील तिच्या सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. उर्वशीची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. खरंतर, या सर्व प्रकरणाची



सुरुवात ऋषभ पंतच्या एका पोस्टमुळे झाली होती. दरम्यान, ही पोस्ट शेअर केल्यानंतर लगेचच त्याने ती डिलीट केली होती. परंतु तोपर्यंत त्याच्या पोस्टचे स्क्रिनशॉर्ट सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्याने त्या पोस्टमध्ये लिहिलं होतं की, हे खूप मजेशीर आहे की लोक इंटरव्ह्यूमध्ये खोटं बोलतात कारण, त्यांना लोकप्रिय व्हायचं असतं आणि हेडलाईन मिळवायची असते.

# आलियाचा 'डार्लिंग्स'आता तमिळ, तेलुगू भाषांमध्ये देखील होणार प्रदर्शित

बॉलिवूड प्रसिद्ध अभिनेत्री आलिया भट्ट आणि अभिनेत्री शेफाली शाह यांचा डार्लिंग्स चित्रपट नुकत्याच काही दिवसांपूर्वी ओटीटीवर प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. आलिया भट्टच्या या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. कौटुंबिक अत्याचारावर आधारित डार्क कॉमेडी चित्रपट पाहून प्रेक्षकांकडून चित्रपटाचं कौतुक केलं जात आहे. आता समोर आलेल्या माहितीनुसार, या चित्रपटाचे निर्माते हा चित्रपट तमिळ आणि तेलुगू भाषेमध्ये देखील बनवण्याचा विचार करत आहेत. याबाबत या चित्रपटाचे प्रोड्यूसर आणि शाहरूख खानच्या रेड चिलीज एंटरटेनमेंटच्या साओओ गौरव वर्मा यांनी कन्फर्म केलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, गौरव वर्मा आणि त्यांच्या टीमने आलिया भट्टच्या डार्लिंग्स चित्रपटाच्या तमिळ आणि तेलुगू भाषेतील स्क्रिप्टवर काम करायला सुरूवात केली आहे. फक्त तमिळ आणि तेलुगू भाषाचं नाही तर हा चित्रपट ते इतर भाषांमध्ये देखील तयार करणार आहेत. परंतु या चित्रपटाची गोष्ट हुबेहुब असणार आहे. यामध्ये काही बदल केला जाणार नाही. मात्र या चित्रपटाची गोष्ट मुंबई मधील आहे.




त्यामुळे तमिळ आणि तेलुगू भाषेमध्ये या चित्रपटाचं ठिकाण आणि भूमिका बदलण्यात येतील. दरम्यान, या चित्रपटाचे निर्माते गौरव वर्मा, आलिया भट्ट आणि गौरी खान आहे. 'डार्लिंग्स'च्या माध्यमातून आलिया ओटीटीवर पदार्पण करत आहे. मागील काही दिवसांपूर्वी या चित्रपटाला सोशल मीडियावर विरोध होत होता. यामागचं कारण म्हणजे लोकांच्या मते, या चित्रपटामध्ये एका पुरूषासोबत होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला डार्क कॉमेडी म्हणून दाखवण्यात आलं आहे. अनेक लोक या चित्रपटाच्या कंसेप्टवर नाराजी व्यक्त करत होते. प्रेक्षकांच्या मते, आलियाच्या या चित्रपटामध्ये मनोरंजनाच्या नावाखाली फक्त पुरूषांवर कौटुंबिक हिंसाचाराला दाखवण्यात आला आहे.

# 24 ऑगस्टपासून 'प्लीज फाइंड अटॅच्ड'चा तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला

शौर्य आणि सान्या यांच्या गोड, निरागस कथेने प्रेक्षकांचे प्रेम आणि कौतुक मिळवल्यानंतर, ॲमेझॉन मिनी टीवी – ॲमेझॉन च्या मोफत व्हिडिओ सेवेने, डायस मीडिया च्या अत्यंत लोकप्रिय शो, 'प्लीज फाइंड अटॅच्ड' च्या तिसर्याप सीझनच्या प्रीमियरची घोषणा केली आहे. मंदार कुरुंदकर दिग्दर्शित, या सिरीज मध्ये प्रतिभावान कलाकार आयुष मेहरा आणि बरखा सिंग हे त्यांच्या प्रमुख भूमिकेत परत येत आहेत. नवीन पाहणाऱ्यांसाठी 'प्लीज फाइंड अटॅच्ड' चे पहिले दोन सीझन डायस मीडियावर प्रीमियर केले गेले. 5-भागांच्या शोच्या तिसऱ्या सीझनचा पहिला भाग 24 ऑगस्ट रोजी प्रीमियर होईल, विशेषतः ॲमेझॉन मिनी टीवी वर ॲमेझॉन शॉपिंग ऐप आणि फायर टीव्ही वर, दर बुधवारी एक नवीन भाग रिलीज होईल. प्लीज फाइंड अटॅच्ड्च्या पहिल्या दोन सीझनमध्ये शौर्य आणि सान्या ऑफिस रोमान्स चे पर्याय बनले होते कारण त्यांनी त्यांच्या नेक्स्ट डोर गर्ल /बॉय सारख्या इमेज संबंधित पात्रांनी मन जिंकले होते. त्यांच्या नातेसंबंधाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमधून जातांना, जोडपे अखेरीस वैयक्तिक आणि व्यावसायिकरित्या एकमेकांना समर्थन देण्यास आणि पूर्ण करण्यास शिकतात. नवीनतम सीझन मनोरंजनाचा डोस तिप्पट करण्याचे आश्वासन देते, जसे हे हार्टथ्रॉब जोडपे म्हणून



त्यांच्या पहिल्या डेटच्या दिशेने वाटचाल करतांना काम आणि जीवन यामध्ये संतुलन साधण्यास शिकतात. विद्युत भंडारी, स्टुडिओ हेड, डायस मीडिया साइड, म्हणाले -"आमच्या प्लॅटफॉर्मवर मिनी सिरीज म्हणून सुरू झालेला आणि ज्याने प्रेक्षकांचे अपार प्रशंसा आणि कौतुक मिळवले. आम्ही गेल्या वर्षी पूर्ण सीझन 2 लॉंच केले तेव्हा त्याने प्रेक्षकांची अधिकच लोकप्रियता काबीज केली. डायस मीडियामध्ये आम्ही नेहमीच वास्तविक जीवनातील अनुभवांवर आधारित आकर्षक कथा तयार करण्याचे सुनिश्चित केले आहे जे आमच्या प्रेक्षकांना मजबूत प्रतिध्वनी निर्माण करतात. प्लीज फाइंड अटॅच्ड्च्या मागील 2 सीझनने कामाच्या ठिकाणी असलेल्या महत्वाकांक्षेचा आधार घेतला आहे.

# लोकप्रिय संगीतकार अजय-अतुल खेळणार 'कोण होणार करोडपती'चा खेळ!

'कोण होणार करोडपती' हा कार्यक्रम कायमच प्रेक्षकांना भावतो. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांमुळे, त्यांच्या संघर्ष कहाण्यांमुळे कायमच इतरांना प्रेरणा मिळते. तर दर शनिवारी रंगणाऱ्या विशेष भागांमुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार होतो. या शनिवारच्या विशेष भागात अवघ्या देशाला आपल्या गाण्यांनी ठेका धरायला लावणारे संगीतकार अजय – अतुल या कार्यक्रमात




सहभागी होणार आहेत. या शनिवारी 'कोण होणार करोडपती'च्या या पर्वाचा शेवटचा भाग असून अजय- अतुल यांच्या उपस्थितीत या पर्वाची सांगता होणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### डायमंड लीग ॲथलेटिक्स : श्रीशंकरला सहावा क्रमांक



**मोनॅको। महाईन्यूज**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेता लांब उडीपटू मुरली श्रीशंकरला पदार्पणीय डायमंड लीग ॲथलेटिक्समध्ये सहावा क्रमांक मिळवत निराशा केली. ७.९४ मीटर ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली. सहा दिवसांपूर्वी बर्मिगहॅम येथे ऐतिहासिक रौप्यपदक पटकावणाऱ्या श्रीशंकरकडून डायमंड लीग स्पर्धेत दिमाखदार कामगिरीची अपेक्षा केली जात होती. जोरदार वाऱ्यांचा पहिल्या फेरीतील खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम जाणवला. श्रीशंकरने राष्ट्रकुलमध्ये ८.०८ मीटर अशी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली होती. याचप्रमाणे चालू हंगामात ८.३६ मीटर अशी वैयक्तिक कामगिरीसुद्धा त्याच्या खात्यावर आहे. युजेन येथे गेल्या महिन्यात झालेल्या जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत ७.९६ मीटर अशी सर्वोत्तम कामगिरी नोंदवत श्रीशंकरने सातवा क्रमांक मिळवला होता.

# सुपर चषक फुटबॉल : रेयाल माद्रिदला जेतेपद!

## अलाबा, बेन्झिमाच्या गोलमुळे एनट्रॅक फ्रँकफर्टवर मात

**। हेलसिंकी। महाईन्यूज ।**



डेव्हिड अलाबा आणि कर्णधार करीम बेन्झिमा यांनी केलेल्या गोलच्या बळावर स्पॅनिश संघ रेयाल माद्रिदने जर्मन संघ एनट्रॅक फ्रँकफर्टवर २-० अशी मात करत युएफा सुपर चषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

बुधवारी मध्यरात्री फिनलंडची राजधानी हेलसिंकी येथे झालेल्या या सामन्यात गेल्या हंगामातील चॅम्पियन्स लीग विजेत्या माद्रिदने सुरुवातीपासून युरोपा लीग विजेत्या फ्रँकफर्टवर वर्चस्व गाजवले. ३७व्या मिनिटाला माद्रिदच्या व्हिनिसियसने मारलेला फटका फ्रँकफर्टचा गोलरक्षक केव्हिन ट्रॅपने अडवला. मात्र माद्रिदला कॉर्नर किक मिळाली. यावर बेन्झिमा आणि कॅसेमिरोच्या साहाय्याने अलाबाने गोल करत माद्रिदला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर बेन्झिमा आणि व्हिनिसियस यांनी पुन्हा गोलचे प्रयत्न केले. मात्र ट्रॅपला चेंडू गोलजाळ्यात जाण्यापासून रोखण्यात यश आले. परंतु ६५व्या मिनिटाला व्हिनिसियसच्या पासवर बेन्झिमाने केलेल्या गोलमुळे माद्रिदला २-० अशी आघाडी मिळाली. बेन्झिमाचा हा माद्रिदसाठी ३२४वा गोल ठरला. त्यामुळे त्याने माजी कर्णधार आणि आघाडीपटू राउलला मागे टाकत माद्रिदसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे. माद्रिदचे प्रतिनिधित्व करताना केवळ ख्रिस्टियानो रोनाल्डोने (४५०) बेन्झिमापेक्षा अधिक गोल केले आहे. माद्रिदने दोन गोलची आघाडी घेतल्यानंतर फ्रँकफर्टने आक्रमणाची गती वाढवली. मात्र त्यांना माद्रिदचा बचाव भेदण्यात अपयश आले.

### विक्रमाशी बरोबरी

रेयाल माद्रिदला यंदा पाचव्यांदा सुपर चषकावर नाव कोरण्यात यश आले. त्यामुळे त्यांनी बार्सिलोना आणि एसी मिलान यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. या तिन्ही संघांनी प्रत्येकी पाच वेळा सुपर चषक पटकावला आहे. माद्रिदने यापूर्वी २००२, २०१४, २०१६ आणि २०१७ मध्ये हा चषक जिंकला होता.

# झिम्बाब्वे दौऱ्यासाठी राहुलकडे नेतृत्व;

## ‘बीसीसीआय’च्या वैद्यकीय पथकाने तंदुरुस्त जाहीर केल्याने भारतीय संघात निवड

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**



अनुभवी फलंदाज केएल राहुलला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वैद्यकीय पथकाने गुरुवारी तंदुरुस्त जाहीर केल्यानंतर आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी त्याची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. झिम्बाब्वेमध्ये होणाऱ्या तीन सामन्यांच्या (१८, २०, २२ ऑगस्ट) एकदिवसीय मालिकेसाठी आधी डावखुरा सलामीवीर शिखर धवनकडे भारतीय संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले होते. मात्र, आता राहुलकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आल्याने धवन उपकर्णधारपद सांभाळेल. राहुल मे महिन्यात झालेल्या ‘आयपीएल’नंतर एकही सामना खेळलेला नाही. त्याला सुरुवातीला दुखापतीमुळे मैदानाबाहेर राहावे लागले होते आणि त्याच्यावर शस्त्रक्रियाही झाली. त्यातून सावरल्यानंतर तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत खेळणार होता; परंतु त्यापूर्वी त्याला करोनाची बाधा झाल्याने त्याचे पुनरागमन लांबणीवर पडले. राहुलला करोनातून सावरण्यासाठी बराच वेळ लागत असल्याने त्याची झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघात निवडही झाली नव्हती. मात्र, आता राहुलने निवडीसाठी आवश्यक तंदुरुस्तीचे सर्व निकष पूर्ण केल्याचे ‘बीसीसीआय’च्या वैद्यकीय पथकाकडून सांगण्यात आले आहे. नियमित कर्णधार क्रेग एर्व्हाइन पायाच्या दुखापतीमुळे भारताविरुद्ध एकदिवसीय मालिकेसाठी मुकणार असून यष्टीरक्षक-फलंदाज रेगिस चकब्वा झिम्बाब्वेचे नेतृत्व करेल.


महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही